भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ३०.११.२०१९ ते ०४.१२.२०१९)

अंक ९६/२०१९ | दिनांक २९.११.२०१९ | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२३/११/२०१९ ते २९/११/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ३०/११/२०१९ ते ०४/१२/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ | २८/११ | २९/११ | दिनांक | | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | २ | ० | ० | १२ | ० |
| ३६.० | ३७.० | ३५.० | ३६.० | ३६.० | ३४.५ | ३४.५ | कमाल तापमान (अं. से) | | ३५.० | ३५.० | ३४.० | ३४.० | ३३.० |
| २१.० | २०.० | १९.० | २०.५ | २०.५ | २१.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | | २२.० | २३.० | २३.० | २२.० | २२.० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ६ | ७ | ८ | ८ | ७ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९१ | ९१ | ९१ | ९१ | ८६ | ८८ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७५ | ७६ | ७४ | ८४ | ७६ |
| ४३ | ४६ | ३७ | ४१ | ४७ | ४६ | ५६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ५२ | ४५ | ५३ | ५५ | ५६ |
| ०.९ | ०.९ | ०.४ | ०.७ | २.१ | १.७ | १.७ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००६ | ००८ | ००९ | ००९ | ००८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून |
| पूर्वे | पूर्वे | पश्चिमे | पूर्वे | पूर्वे | पूर्वे | पूर्वे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४५९१.० | ४५९१.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** दिनांक ३० नोव्हेंबर व ३ डिसेंबर रोजी जिल्हयात हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगावातील भात लागवडीच्या पुर्व तयारीस सुरुवात करावी. उन्हाळी भात पीकासाठी १ हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रात गादीवाफे तयार करुन घ्यावेत. जमिनीचा उतार लक्षात घेऊन निच-याच्या जागी तळाशी १२० सेमी आणि प्रुष्ठभागाशी ९० सेमी रुंदीचे ८ ते १० सेमी उंचीचे योग्य त्या लांबीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यात प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. बियाण्यास ३% मिठाच्या द्रावणाची (३०० ग्रम मीठ/१० लि. पाणी) प्रक्रिया करावी. वाफ्यावर ५ ते ८ से.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सेमी खोलीवर बी पेरुन घ्यावे. जाड दाण्यांच्या जातीसाठी ५० किलो तर बारीक दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे वापरावे. वायंगणी भात पीकाची पेरणी सुधारीत बियाण्यांचा वापर करुन करावी. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे.<br>रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे.<br>मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन द्यावे. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | ढगाळ वातावरणामुळे आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे. नवीन पालवीवर तुडतुडे, फुलकीडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% प्रवाही (०.९ मिली प्रती १ लीटर पाणी) किंवा थायोमेथॉक्झोन २५% (WDG) (०.१ ग्रम प्रती लीटर पाणी) या किटकनाशकांची फवारणी करावी. |
| काजु | मोहोर | ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविदया महाविदयालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उदयानविदया महाविदयालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उदयानविदया महाविदयालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उदयानविदया महाविदयालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)